


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७७९. वा | बुधवार | दि. २२ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी करतात कनिष्ठांचा छळ

## कनिष्ठ लिपिकाचा आपल्याच अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप


## या प्रकरणात आम्ही संबंधित अधिकाऱ्याना दूरध्वनी वर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु तो होऊ शकला नाही

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात बोकाळलेली अव्यवस्था, अनागोंदी तर भ्रष्टाचार यासंदर्भात सातत्याने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज प्रकाश टाकण्याचे काम करीत आहे. या भ्रष्टाचार प्रकरणी आता चौकशी समित्याही गठित होत आहेत. या संपूर्ण अव्यवस्थेत आता नवनवी प्रकरणे समोर येऊ लागली आहेत. जिल्हा रुग्णालयात कार्यरत काही वरिष्ठ अधिकारी हे नाहक आपल्याच कनिष्ठ कर्मचाऱ्यांचा शारीरिक व मानसिक छळ करीत असल्याचे एक प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी तक्रारदार कनिष्ठ लिपिकाने वरिष्ठांवर गंभीर आरोप केले असून, अद्यापही या कनिष्ठ लिपिकास न्याय न मिळाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पर्यायाने संबंधित कनिष्ठ लिपिक आज प्रचंड मानसिक तणावात असल्याचे दिसून येत आहे. बुलढाणा जिल्हा रुग्णालयाचे काम खऱ्या अर्थाने समाजातील गरीब व गरजू लोकांना चांगली आरोग्य सुविधा देणे हे आहे. परंतु या रुग्णालयात रुग्णांना एकीकडे चांगली सुविधा तर अजिबात मिळत नाही, पण दुसरीकडे हे रुग्णालय म्हणजे एक गाव बारा भानगडी असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे. यापूर्वी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने जिल्हा रुग्णालयात विविध विकासकामे व साहित्य,औषधी-

**पोस्टमार्टम ८९**

उपकरणांच्या खरेदीतील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणला होता. दुसरीकडे रुग्णालयातील अनेक डॉक्टर हे रुग्णालयात गैरहजर राहून खासगी रुग्ण सेवा करीत असल्याचीही बाब सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने समोर आणली. सध्या या जिल्हा रुग्णालयाची सेवा ही पूर्णपणे व्हेंटिलेटरवर असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. यातच या रुग्णालयात चालणाऱ्या नवनवीन भानगडी समोर येत आहे. ताजी घटना रुग्णालयातील कनिष्ठ लिपिक विशाल वाघ यांच्यासंदर्भातील आहे. विशाल वाघ हे गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा रुग्णालयात कार्यरत आहेत. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे दिलेल्या तक्रारीत त्यांनी वरिष्ठ अधिकारी तथा वीजतंत्री यांच्यावर गंभीर आरोप केलेले आहेत. यांनी त्यांचा वरिष्ठ अधिकारी व साथीदार अनिल मेढे यांच्या सहकार्याने खोटे आरोप लावून चौकशी लावल्याचा आरोप वाघ यांनी आपल्या पत्रात केला आहे. वरिष्ठयाशिवाय सातत्याने वरिष्ठ अधिकारी व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपणास हेतुपुरस्सर त्रास दिल्याचा आरोपही वाघ यांचा आहे. वाघ यांनी दिलेल्या पत्रात आपली कैफियत मांडताना सांगितले की, त्यांना होत असलेल्या त्रासाबाबत त्यांनी सातत्याने जिल्हा रुग्णालय तसेच आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पत्र व्यवहार करून माहिती दिलेली आहे. परंतु वरिष्ठांनी न्याय देण्यासंदर्भात कोणतीही ठोस कारवाई केली नाही. वाघ यांनी आपल्या पत्रात अभोरे व विद्यमान जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून संगनमताने त्रास दिल्या जात असल्याचा आरोप केला आहे. अभोरे हे अक्षरशः बाहेरील व्यक्तीला खंडणी देऊन आपल्याला त्रास देत असल्याचा आरोप वाघ यांनी केला आहे. वाघ यांनी एव्हढे गंभीर आरोप केल्यानंतर आणि त्यांना होणाऱ्या त्रासासंदर्भात वरिष्ठांना वारंवार कळवून देखील वरिष्ठांनी काहीही कारवाई न केल्याचा आरोप केला आहे. यावरून जिल्हा रुग्णालय प्रशासन आणि आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी हे भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे स्पष्ट होत आहे. भ्रष्टाचाराने बरबटलेले जिल्हा रुग्णालय प्रशासनात आता अशाप्रकारे कनिष्ठ अधिकाऱ्यांना शारीरिक व मानसिक त्रास देण्याचा अत्यंत घृणास्पद व




घाणेरडा खेळ सुरू आहे. या संपूर्ण प्रकरणाकडे वरिष्ठांकडून केले जाणारे दुर्लक्ष हे अत्यंत गंभीर असून, अशा भ्रष्ट आणि ढिसाळ अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने जिल्हा रुग्णालयात बोकाळलेली अव्यवस्था आणि भ्रष्टाचारावर आसूड ओढण्याचे काम करीत आहे. परंतु अशाप्रकारे कनिष्ठ अधिकाऱ्यांवर अन्याय होत असेल तर त्याविरोधातही आवाज उठवण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीतच राहणार आहे. आरोग्य उपसंचालक अकोला किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आता यासंदर्भात काही कारवाई करणार आहात का, हा प्रश्न आज जरी अनुत्तरित असला, तरी या प्रश्नाची तड लावल्याशिवाय सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन शांत बसणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात

# शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली व्यवसायिकाला साडेबारा लाखांचा गंडा...




**जनसंचलन/ खामगाव**

शेअर ट्रेडिंगची गुंतवणूक करून चांगला नफा मिळवून देण्याच्या भुलथापा देऊन भामट्याने शहरातील एका व्यावसायिकाला तब्बल साडेबारा लाखांनी फसविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी व्यवसायिकाच्या तक्रारीवरून बुलढाणा सायबर पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. खामगाव शहरातील व्यावसायिक साकेत प्रेम सराफ वय ४८) रा. अकोला रोड खामगाव यांना काही दिवसापूर्वी त्यांच्या मोबाईल क्रमांकवर मॉर्गन स्टेनले बिजनेस स्कूल या नावाने शेअर ट्रेडिंग गुंतवणुकीबाबत एका अनोळखी व्यक्तीकडून विचारणा करण्यात आली. यावेळी सदर शेअर ट्रेडिंग गुंतवणुकीमध्ये मोठा नफा मिळत असल्याचे भासवून साकेत सराफ यांचा विश्वास संपादन करून सदर अनोळखी व्यक्तीने त्यांना असिस्टंट लिंडा चाट नाव असलेले एक एप्लिकेशन डाऊनलोड करण्याचे सांगितले त्यावरून त्यांनी एक एप्लीकेशन डाउनलोड केले असता त्यामध्ये भरपूर नागरिक गुंतवणूक करत असल्याचे दिसून आले. यावरून सराफ हे सुध्दा शेअर ट्रेडिंग गुंतवणुकीमध्ये सहभागी झाले. त्यांनी त्यांच्या एचडीएफसी बँकेच्या खात्यामधून आयएमपीएस द्वारे अज्ञात व्यक्तीने दिलेल्या उदय डिजिटल वे ओपीसी प्रायव्हेट लिमिटेड या बनावट कंपनीच्या खाते क्रमांक मध्ये वेगवेगळ्या तारखेला एकूण १२ लाख ५५ हजार रुपये शेअर म्हणून गुंतवणूक केले. परंतु त्यांना कुठलाही नफा मिळत नसल्याचे दिसून आले व संबंधित अनोळखी इसमाने शेअर मार्केटिंगच्या नावाखाली त्यांची फसवणूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले. याप्रकरणी साकेत सराफ यांनी बुलढाणा सायबर पोलीस स्टेशन बुलढाणा येथे तक्रार दिली असून तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध कलम ४१९, ४२० सहकलम ६६ (क) माहिती तंत्रज्ञान सुधारणा अधिनियम २००८ भादंवी नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास बुलढाणा सायबर सेलचे पो. नि. अशोक रत्नपारखी हे करीत आहेत.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# श्रींची पालखी १३ जूनला पंढरपूरसाठी मार्गस्थ यंदा पालखीचे ५५ वे वर्ष ३३ दिवसांची पायदळ वारी...

**जनसंचलन/शेगाव**

लाखों भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री संत गजानन महाराजांची पालखी सालाबादप्रमाणे यंदा १३ जून २०२४ रोजी आषाढी वारीसाठी संतनगरीतून पंढरपूर करिता मार्गस्थ होणार आहे. सकाळी ७ वाजता भक्तिमय वातावरणात धार्मिक सोपस्कार पार पाडून श्रींची पालखी पंढरपूरला आषाढी सोहळ्या करिता मार्गक्रमण करेल. यंदा पालखीचे ५५ वे वर्ष असून इकडून जातांना ३३ दिवसांची पायदळ वारी करीत वारकरी पंढरीत दाखल होणार आहेत. पहिल्या दिवशी दुपारी नागझरी व रात्री पारस येथे मुक्काम राहील. १४ जूनला गायगाव रात्री भौरद, १५ व १६ जून पालखी अकोला राहील. त्यानंतर १७ जून भरतपूर रात्री वाडेगाव, १८ जून देऊळगाव (बाभूळगाव) रात्री पातूर तर १९ जूनला मेडशी रात्री श्रीक्षेत्र डव्हा,



२० जून मालेगाव रात्री शिरपूर जैन, २१ जून चिंचाबा पेन रात्री म्हसला पेन, २२ जून किनखेडा रात्री रिसोड, २३ जून पान कन्हेरगाव रात्री सेनगाव, २४ जून श्रीक्षेत्र नरसी रात्री डिग्रस, २५ जून श्रीक्षेत्र औंढा नागनाथ रात्री जवळा बाजार, २६ जून (अडगाव रंजोबा) हट्टा रात्री श्रीक्षेत्र त्रिधारा, २७ जून परभणी, २८ जून ब्राम्हणगाव रात्री दैठण, २९ जून खळी रात्री गंगाखेड, ३० जून वडगाव (दादा हरी) रात्री परळी थर्मल, १ जुलै परळी वैजनाथ, २ जुलै कन्हेरवाडी रात्री अंबाजोगाई, ३ जुलै लोखंडा सावरगाव रात्री बोरी सावरगाव, ४ जुलै गोटेगाव रात्री कलंब, ५ जुलै गोविंदपूर रात्री तेरणा सा. कारखाना, ६ जुलै किनी रात्री उपडा माकडाचे, ७ जुलै संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर धाराशिव रात्री धाराशिव, ८ जुलै वडगाव सिद्धेश्वर रात्री श्रीक्षेत्र तुळजापूर, ९ जुलै सांगवी रात्री उळे, १० जुलै सोलापूर, ११ जुलै सोलापूर, १२ जुलै सोलापूर रात्री तिरहे, १३ जुलै कामती (वाघोली) रात्री माचपूर, १४ जुलै ब्रम्हपुरी रात्री श्रीक्षेत्र मंगळवेढा, १५ जुलै रोजी पालखी श्रीक्षेत्र मंगळवेढा वरून विठुरायाच्या पंढरीत दाखल होणार आहे. पंढरपूर येथे १७ जुलै रोजी आषाढी सोहळा आटोपून पाच दिवसांच्या मुक्काम नंतर २१ जुलै पासून परतीचा प्रवास सुरु होणार असून पुन्हा २२ दिवसांचा पायदळ परतीचा प्रवास करीत श्रींच्या पालखीचे ११ ऑगस्ट रोजी स्वगृही आगमन होईल.

# बसस्थानकावर पर्समधून दीड लाखाचे दागिने लंपास

**जनसंचलन/ शेगाव**

येथील बसस्थानक वरून अज्ञात चोरट्याने महिलेच्या पर्समधून दिड लाखाचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना २० मे रोजी दुपारी १.३० वाजता घडली. याबाबत शशीकांत गणेशराव रावणकार वय ३४ वर्षे रा. वानखेड ता संग्रामपुर यांनी पोलिसात फिर्याद दिली की, माझा भाऊ अमोल रावणकर हा आर्मी मध्ये नौकरी करतो. २० मी रोजी माझा भाऊ, त्याची पत्नी व मुलगी असे तिघे छत्रपती संभाजीनगर येथून शेगाव येथे आले व घरी वानखेड येथे येण्यासाठी शेगाव बस स्थानकावर जळगाव बस मध्ये बसत असताना माझ्या वहिनीचे पर्स मधून मंगळसूत्र वजन २७.०१० कीमत ७६ हजार ८१६ रुपये, नेकलेस वजन १० ग्रॅम मूल्य २९ हजार ४८७ रुपये, कानातले



टॉप्स वजन ३.६८० मीलीग्रॅम किंमत १० हजार ४८४ रुपये, कानातले टॉप्स वजन ३.४३० ग्रॅम कींमत ९ हजार ३८१ रुपये, इयरिंग वजन ५.५६० ग्रॅम किंमत २७ हजार ४८० असा एकुण ४९ ग्रॅम ६८० मीली कींमत १ लाख ५३ हजार ६४० रुपयांचे सोन्याचे दागिने कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहेत अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून कलम ३७९ भादंविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिंदखेडराजा नगरपालिकेने रस्त्यावरचे अतिक्रमण हटवले!

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

मिातृतीर्थ तालुका म्हणून सिंदखेड राजा शहराचं नाव संपूर्ण भारत देशामध्ये आदराने घेतले जाते याचं मुख्य कारण म्हणजेच राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांचा सिंदखेडराजा जन्मस्थळ आहे यामुळेच संपूर्ण देशभरामध्ये सिंदखेडराजा शहराचे नाव आदराने घेतले जाते परंतु मातृतीर्थ तालुका असूनही सिंदखेडराजा शहराचा पाहिजे तसा विकास झाला नाही , राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातून हजारो अनुयायी सिंदखेडराजा येथे येत असतात परंतु येथे आल्यानंतर मुख्य जो महामार्ग आहे सिनखेडराजा ते मेहकर या महामार्गावर सिंदखेडराजा तहसील पासून तर राजवाड्यापर्यंत अनेक छोट्या मोठ्या दुकानदाराने आपला व्यवसाय सुरू करण्यासाठी दुकान थाटली आहेत दुकाने तर आहेच परंतु रस्त्या जवळच अनेकांनी समोर तीन पत्रे सुद्धा टाकलेली आहे त्यामुळे वाहनधारकांना वाहने उभे करण्याकरता जागा शिल्लक नसायची त्यामुळे वाहने अस्ताव्यस्त कुठेही उभे राहत असत,त्यामुळे मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण व्हायचं,परंतु



सिंदखेडराजा नगरपालिकेचे मुख्य अधिकारी प्रशांत व्हटकर यांनी खडक मार्ग अवलंबून रस्त्यालगत असलेले अतिक्रमण जेसीबी च्या साह्याने व पोलीस संरक्षणाच्या माध्यमातून नगरपालिकेचे कर्मचारी सोबत घेऊन काढून टाकले आहे,त्यामुळे रस्त्याने आता थोडाफार का होईना मोकळा श्वास घेतला आहे,, त्यामुळे टपरीधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते अनेक टपरीधारकांनी आपला छोटा मोटा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह त्याठिकाणी भागवत आहेत,त्यामुळे ज्याची टपरी उठवली आहे अशांना नगरपालिकेने पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सुद्धा होत आहे,यावेळी नगरपालिकेचे कर्मचारी तसेच सिंदखेडराजा पोलीस स्टेशनच्या वतीने पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता .

# घोटाळेबाज दोन पतसंस्थेविरूद्ध सहकार खाते ॲक्शन मोडवर...

**वृत्तसंस्था/हिंगोली**

शहरातील पतसंस्थांमध्ये झालेल्या घोटाळ्यांच्या तक्रारी प्रकरणी सहकार खाते ॲक्शन मोडव्वर आले असून एका पतसंस्थेच्या संचालक व कर्मचार्यांच्या मालमत्तेच्या जप्तीची नोटीस देण्यात आले आहे तर दोन पतसंस्थांचे टेस्ट ऑडिटफ सुरू करण्यात आले आहेत. मागील आर्थिक वर्षात हिंगोली शहरातील तीन पतसंस्थांमध्ये झालेले गैरप्रकार उघडकीस आल्याने सहकार क्षेत्रात मोठा विस्फोट झाला होता. या अंतर्गत सर्वात प्रथम समोर आलेल्या कुलस्वामीनी महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालकांवर यापूर्वीच गुन्हे दाखल झाले असून संचालकांच्या नावाने असलेल्या मालमत्तेबाबत कारवाई सुरू झाली होती. यानंतर झालेल्या अनुराधा नागरी सहकारी पतसंस्थेतील गैरव्यवहारा बाबत सहकार विभागाने प्रारंभिक कारवाई केली होती. कारवाईच्या दुसर्या टप्प्यात सहकार विभागाने पतसंस्थेचे संचालक व कर्मचार्यांना सहकार कायदा कलम ९५ अंतर्गत जप्तीची नोटीस बजावली आहे. संचालक व कर्मचार्यांनी समाधानकारक खुलासा न केल्यास त्यांची संपत्ती जप्त





करण्यात येणार असल्याचे सहकार विभागाचे म्हणणे आहे. या सोबतच अनुराधा पतसंस्थेसहीत हिंगोली महिला नागरी सहकारी पतसंस्था व याच संचालकांशी निगडीत असलेल्या आणखी एका पतसंस्थेचे टेस्ट ऑडिट सुरू करण्यात आल्याची माहिती हिंगोली तालुका सहकारी संस्थाचे सहाय्यक निबंधक माधव यादव यांनी दिली आहे. दोन्ही संस्थांच्या टेस्ट ऑडिटसाठी प्रत्येकी तीन सभासद असलेली दोन पथके स्थापन करण्यात आली आहेत. दोन आठवड्यांत या पथकांचा अहवाल अपेक्षित आहे. गैरव्यवहार कुलस्वामीनी महिला अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या ४८१० ठेवीदारांच्या १० कोटी ६८ लाख ४१ हजार ४३३ रुपयांचा तर अनुराधा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीमध्ये ४०३८ ठेवीदारांनी गुंतवणुक केलेल्या ६ कोटी २७ लाख ६५ हजार १३० रुपयाच्या रक्कमेचा अपहार संचालक मंडळ व कर्मचार्याने मंडळाने केला.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# भारत उच्च माध्यमिक विद्यालयाची निकालाची यशोगाथा कायम





**जनसंचलन/बुलढाणा**
भारत कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्या यशाची परंपरा यावर्षीच्या निकालात सुद्धा कायम ठेवली आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचा यावर्षीचा विज्ञान शाखेचा निकाल ९९.०६% तर कला शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे . यामध्ये विज्ञान शाखेतून एकूण १०७ विद्यार्थ्यांपैकी प्राविण्य श्रेणीत ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ६१ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये ११ विद्यार्थी द्वितीय श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत . तर कला शाखेचा निकाल हा १०० टक्के लागला असून ४० विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थी प्राविण्यश्रेणी, १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून पुष्कर प्रदीपराव देशपांडे हा विद्यार्थी ९४.६७ टक्के गुण घेऊन प्रथम तर सृष्टी श्रीराम देशमुख ९१.१७ टक्के गुण घेऊन द्वितीय आणि कृष्णकांत श्रीकांत पाटील ८९.८३ टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. तर कला शाखेतून शर्वरी राजेश पिंगळे ८९.०० टक्के घेऊन प्रथम , दिक्षा सुनिल पारवे ८७.५० टक्के गुण घेऊन द्वितीय तर नंदिनी ज्ञानेश्वर आराख ८५.५० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. सर्व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ सीमा आगाशे , उपाध्यक्ष उदय देशपांडे , सचिव अंगद आगाशे तसेच संचालक मंडळातील सर्व सन्माननीय सदस्य, मुख्याध्यापक प्रल्हाद गायकवाड , उपमुख्याध्यापक मोहन घोंगटे, पर्यवेक्षक नवल गवई व सर्व शिक्षकांनी कौतुक केले आहे.

# शिवसाई यूनिवर्सल जुनिअर कॉलेज कोलवड , बुलडाणा ची १२वी परीक्षेत १००% निकालाची परंपरा कायम

**जनसंचलन/बुलडाणा**
फेब्रुवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने घेतलेल्या परीक्षा मध्ये शिवसाई यूनिवर्सल ज्युनिअर कॉलेज कोलवड बुलडाणा येथील ११० विद्यार्थी प्रवेशित झाले होते. यापैकी एकूण ३० विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, ७६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ०४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. याप्रमाणे महाविद्यालयाने आपली १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातून कु. जान्हवी प्रसाद तोडकर व कु. प्रीती सुनील राजपुत या दोघांनी ८४.३३% गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर आदित्य समाधान पाटील याने ८३.५०%गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक तर त्रुतिय क्रमांक कु. गिरिजा विलास शेजुल व विनोद मगन शिंगणे यांनी ८२.६७% गुण प्राप्त केले आहेत. याशिवाय प्रतीक मिलिंद वाघमारे ८०.८३%,उदय किशोर राजपुत ८०.६७%,कु. कोमल राजु भवटे व शुभम रमेश सरदार यांनी ८०.६७% गुण प्राप्त केले आहेत. शिवसाई यूनिवर्सल ने , व परीक्षेत देखील आतापर्यंत आपला निकालाचा दबदबा कायम ठेवला आहे. आतापर्यंत एकूण १४ विद्यार्थी ,४१ विद्यार्थी व साठी प्रवेशित झाले आहेत. तर च्या माध्यमातून १ विद्यार्थी , ५ विद्यार्थी व ५ विद्यार्थी साठी प्रवेशित झाले आहेत. तर परीक्षेच्या माध्यमातून शेकडो विद्यार्थी इंजिनियरिंग, अग्रिकल्चर , नर्सिंग , फार्मसी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित झालेले आहेत. विद्यार्थ्यांच्या यशासाठी प्राचार्य डॉ. सुनील दाभाडकर (जीवशास्त्र ),प्रा. रिजवान खान (केमिस्ट्री),प्रा.विशाल निकम (फिजिक्स),प्रा.राजपुत (गणित )यांनी परिश्रम घेतले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शक करणार्या सर्व विषय शिक्षक तथा प्राध्यापकांचे संस्था अध्यक्ष श्री. डी एस लहाने सर यांनी अभिनंदन केले.

# मान्सूनपूर्व देखभाल दुरूस्तीच्या कामांना महावितरणकडून गती

## ग्राहकांनी सहकार्य करावे : महावितरण...

**जनसंचलन/बुलढाणा**
मागिल काही दिवसांपासून सुरु असलेल्या उनाच्या तडाक्यासोबतच अधून-मधून येणारा अवकाळी पाऊस व त्यानंतरच लगेचच सुरु होणारा पावसाळा वीज ग्राहकांना सुसह्य व्हावा यासाठी महावितरणने विविध ठिकाणी मान्सुमपुर्व देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेतली आहेत. जिल्ह्यात सर्वत्र वीज यंत्रणांच्या देखभाल दुरूस्तीसह वीज वाहिन्यांच्या आड येणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटणे या व अशा इतर कामाचा यात समावेश. कडक उन्हाच्या झळा झेलत महावितरणचे कर्मचारी देखभाल व दुरुस्तीच्या कामात गुंतले आहेत. मागील काही महिन्यांपासून बुलडाण्यासह संपुर्ण विदर्भात अंगाची लाही-लाही करणारे तापमान आहे, त्यातच अधून-मधून वीजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस पडण्याच्या घटनाही या काळात मोठ्या प्रमाणात झाल्या आहेत. महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेतील बहुतांश सामग्री ही उघड्यावर असल्याने वातावरणात होणा-या बदलाचा प्रतिकुल परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होत असतो व पर्यायाने त्याचा परिणाम ग्राहक आणि ग्राहक सेवांवर होतो. यामुळे ऊन्हाळा व त्यानंतर लगेच सुरु होणारा पावसाळा हा वीज ग्राहकांना सुसह्य व्हावा यासाठी महावितरण कामाला लागली आहे. वाढलेल्या झाडांच्या फांद्या तारांवर लोंबकळत असतात, या फांद्या काही ठिकाणी तारांवर घासत असतात व यामुळे विद्युत यंत्रणेची क्षती होत असते. जिल्ह्यातील सर्व संबंधितांनी आपापल्या भागातील यंत्रणेची या दृष्टीने चाचपणी करून गरजेनुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मदतीने या फांद्या छाटण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत. वीज तारांमध्ये अडकलेले पतंग, मांजा, पताका, तोरण, फ्लेक्स बॅनर्स, प्लास्टिक झेंडे याचाही फटका यंत्रणेला बसत असतो, यामुळे वीजपुरवठा खंडीत होतो. वीज वाहिन्यांत अडकलेले पतंग, मांजा, कपडयांचे तुकडे किंवा तत्सम काहीही तारांवर असेल तर ते वेळीच काढून टाकण्याच्या सुचनाही करण्यात आल्या आहेत. सैल झालेले गार्डीग व स्पॅन घट्ट करणे, दोन खांबांमधील झोल पडलेल्या तारा ओढून घेणे, सर्व खांब आणि त्यांचे ताण सुस्थितीत करण्याचे कामही मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले आहे. वीज उपकेंद्रातील



रोहीत्रांमधील तेलाची योग्य पातळी राखणे तसेच ब्रिदरमधील सिलीका जेल पिंगट झाले असल्यास ते बदलणे. वीजवितरण यंत्रणेत अर्थिंगचे महत्व अधिक आहे, याकरिता रोहीत्रांचे अर्थिंग मजबूत करणे, पोल, वितरण पेट्या, फिडर पिलर्स, मिनी फिडर पिलर्स या सर्वांचे अर्थिंग सु-स्थितीत करण्याचे कामही मोठया प्रमाणात सुरू करण्यात आली आहे. याशिवाय वीज खांब आणि तारांचे मजबुतीकरण, वीजेचे खांब, तारा बदलणे किंवा झोल काढणे, जुन्या फिडर पिलरमध्ये इन्सुलेशन स्प्रे मारणे तसेच पावसाचे पाणी साचणाऱ्या परिसरातील फिडर पिलरची उंची वाढवणे, रोहित्रांचे अर्थिंग तपासणे, ऑइल फिल्टरेशन, उपकेंद्रातील ब्रेकरची दुरुस्ती, बॅटरी चार्जिंग, फ्यूज बदलणे अशी विविध कामे सर्वत्र मोठ्या प्रमाणात सुरु आहेत.

# सहकार विद्या मंदिरची १२ वीच्या १०० टक्के निकालाची यशाची परपंरा आजही कायम

**जनसंचलन/बुलढाणा**
फेब्रुवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने घेतलेल्या आहे. त्यांचा निकाल दि २१ मे रोजी लागला असून त्या मध्ये नेहमी शिक्षणासाठी अग्रेसर असणारी सहाकर विद्या मंदिरचा निकाल या वर्षी सुध्दा नेहमी प्रमाणे अव्वल म्हणजे १०० टक्के लागला आहे. आपल्या यशाची परपंरा आजही त्यांनी कायम ठेवली आहे.या यशाचे श्रेय विद्यार्थी आपल्या आई वडिल, सहकार विद्या मंदिरच्या अध्यक्षा कोमलताई झंवर,भाईजी राधेश्यामजी चांडक तसेच शिक्षकवर्ग यांना देत आहे. दरवर्षी प्रमाणे उत्कृष्ट निकाल या वर्षी सुध्दा लागला आहे.यामध्ये




भाग्यश्री कुळकर्णी हिला ९२.१७ टक्के,रोहित लेकरांजनी ९१.३३ टक्के,अनुषका टाकुरवारे ९०.६७ टक्के,रितेश गोसावी ९०.६७ टक्के,श्रध्दा लवाळे ९०.६७,भक्ती लवाळे ८९.५० टक्के,प्रतिक्षा पंडित ८९.०० टक्के,तुषार पवार ८९.०० टक्के,अर्थव शर्मा ८८.३३ टक्के,धनश्री कोचार ८८.०० टक्के,साची मालो ८८.०० टक्के,शामला जाधव ८८.१७ टक्के,कोमल शेळके ८८.०० टक्के,अर्थव जंगीड ८६.६३ टक्के,चैताली अग्रवाल ८६.६३ टक्के,लक्षीका चंचलवाल ८३.१७ टक्के,अदित्य जैसवाल ८२.६७ टक्के,प्रतिक्षा बंगार ८२.१७ टक्के असा हा निकाल लागलेला आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भाजपचा ३१० जागांवर विजय निश्चित अमित शहा यांचा दावा...

## सहाव्या आणि सातव्या टप्प्यांनंतर भाजप ४००हून अधिक जागा मिळवेल



वृत्तसंस्था/ओडिशा

लोकसभा निवडणुकीच्या पाच टप्प्यांनंतर भाजपचा ३१० जागांवर विजय निश्चित असल्याचा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी केला. ओडिशा राज्याला ङ्कबाबू राजफ्मासून मुक्त करावे आणि केंद्र व राज्यात भाजपला सत्ता स्थापन करण्याची संधी द्यावी, असे आवाहन ओडिशातील प्रचारसभेत बोलताना शहा यांनी केले.ओडिशातील संबलपूर मतदारसंघात भाजपकडून केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या प्रचारसभेत बोलताना शहा यांनी यावेळी यंदा ओडिशात कमळ फुलेल, असा विश्वास व्यक्त केला. ङ्कलोकसभा निवडणुकीच्या पाच टप्प्यांनंतर भाजपचा ३१० जागांवर विजय निश्चित आहे. सहाव्या आणि सातव्या टप्प्यांनंतर भाजप ४००हून अधिक जागा मिळवेल,फ असा दावा शहा यांनी केला.शहा यांनी यावेळी सत्ताधारी बीजेडी सरकारला जोरदार टीका केली. ओडिशात मूठभर अधिकाऱ्यांची सत्ता असून बीजेडी सरकारने ओडिशाचा अभिमान, भाषा, संस्कृती आणि परंपरा यांचा अपमान केल्याचा आरोप त्यांनी केला. ङ्कया निवडणुकीमुळे राज्यात सुरू असलेले बाबू राज संपुष्टात येईल. भाजप राज्यात सत्तेवर आल्यास पक्षाकडून तरुण, उत्साही, मेहनती आणि गतिमान असा ओडिया भूमिपुत्र मुख्यमंत्री म्हणून दिला जाईल,फ अशी ग्वाही त्यांनी दिली.प्रचारसभेत त्यांनी मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनाही लक्ष्य केले. ङ्कमुख्यमंत्री नवीन पटनायक राज्याच्या खनिज संपत्तीची लूट करण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत. ते ओडिशावर ङ्कबाबू शाहीफ लादत आहेत आणि ओडिया लोकांच्या स्वाभिमानावर आणि प्रतिष्ठेवर घाला घालत आहेत. ते राज्याच्या संस्कृतीचा आणि अभिमानाचा गळा घोटत आहेत,फ असा आरोपही त्यांनी केला. ओडिशातील नागरिकांनी भाजपला मत दिल्यास उत्कल भूमीवर भूमिपुत्रांचे राज्य असेल, तमिळ बाबूंचे नाही,फ असा विश्वास शहा यांनी दिला.बीजेडी सरकारला जगन्नाथ मंदिराचे व्यावसायिक केंद्र बनवायचे आहे. मठ आणि मंदिरे उद्ध्वस्त झाली आहेत आणि मंदिराचे चारही दरवाजे अद्याप भाविकांसाठी उघडलेले नाहीत. भगवान जगन्नाथाची जगप्रसिद्ध रथयात्रा थांबवण्याचे षडयंत्रही रचले गेले होते,फ असा दावा शहा यांनी यावेळी केला. तसेच, संबळपूर येथे भाजप ५०० खाटांचे रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय बांधेल आणि तेंदू पान कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधीची तरतूद करेल, असे आश्वासन शहा यांनी यावेळी दिले.

## भाजपचा ५ टप्प्यात लोकसभा निवडणूक घेण्याचा प्लॅन फसला, गोपनीय सर्व्हेत मोदी सरकारला फक्त १५० जागा-भास्कर जाधव

वृत्तसंस्था/रत्नागिरी

महाराष्ट्रात पाच टप्प्यात लोकसभा निवडणूक घेण्याची भाजपची रणनीती फसली. याबाबत भाजपचं गणित पूर्णपणे चुकलं. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत भाजपला फक्त १५० जागांवर विजय मिळेल, असा दावा ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी केला. ते सोमवारी रत्नागिरीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी भास्कर जाधव यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला. मी माझ्या संपूर्ण राजकीय जीवनात महाराष्ट्रात कधीही लोकसभा निवडणुकीचे पाच टप्प्यात मतदान झालेले पाहिले नाही. महाराष्ट्रातूनच केंद्रातील सरकार हद्दपार होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने पंतप्रधान मोदी यांना महाराष्ट्रात प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळावा, यासाठी पाच टप्प्यात निवडणुकीचे आयोजन करण्यात आले. माझ्या अनुभवानुसार, पाच टप्प्यांमध्ये लांबलेले मतदान भाजपच्या विरोधात गेले. निवडणुकीच्या दोन टप्प्यांनंतर भाजपने ४०० पारची भाषा बंद केली. त्यानंतर भाजपची भाषणाची आणि प्रचाराची पातळी खालावत गेली. भाजपचा प्रचार भरकटत गेला. ते विषयाला धरुन बोलले नाहीत. या सगळ्यामुळे महाराष्ट्रातील सुसंस्कृत जनता दुखावली गेली. पंतप्रधान पदावरील व्यक्तीने अशाप्रकारची भाषण वापरणे कोणालाही अपेक्षित नव्हते. भाजप पाच टप्प्यात निवडणूक घेण्याचा फायदा होईल, असे वाटले होते. पण भाजपचं हे गणित



फसले, असे भास्कर जाधव यांनी म्हटले.लोकसभा निवडणूक संपल्यानंतर १ जूनला एक्झिट पोलचे निष्कर्ष जाहीर होतील. पण त्यापूर्वीच काही गोपनीय सर्व्हे करण्यात आले आहेत. या गोपनीय सर्वेक्षणांचा कल पाहता मोदी सरकार लोकसभा निवडणुकीत १५० जागांचा आकडाही पार करणार नाही. तर इंडिया आघाडी लोकसभेच्या ३५० पेक्षा जास्त जागा जिंकेल, असा दावा भास्कर जाधव यांनी केला.

## पती-पत्नीच्या वादाचा एसटी बसमध्ये राडा गुन्हा दाखल




जनसंचलन/ खामगाव

पतीने चक्क चालकासोबतच वाद घालून माझ्या पत्नीला बच्चा खाली उतरून द्या असे म्हणत राडा केला. त्यामुळे प्रवाशांना तर त्रास झालाच व या एसटी बसच्या उर्वरित बस फेऱ्याही रद्द झाल्या. त्यामुळे एसटी महामंडळाचे ही नुकसान झाले. या घडलेल्या प्रकाराबाबत एसटी चालकाने पिंपळगाव राजा पोस्टेला तक्रार दिली आहे. या तक्रारीवरून राडा करणारे पती विरुध्द पिंपळगाव राजा पोलिसांनी शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २० मे रोजी घडली आहे. खामगाव आगराची एसटी बस सोमवारी सकाळी ८.३० वाजता ढोरपगावसाठी निघाली होती. ढोरपगाव येथून परत येत असताना या एसटी बस मध्ये आकाश सुभाष धुरंदर याची पत्नी बसली होती. हे पाहून आकाशने एसटी बसचा चालक ज्ञानदेव नारायण गवई यांच्यासोबत वाद घालून माझ्या पत्नीला बसच्या खाली उतरून द्या अन्यथा तुम्हाला जीवानिशी ठार मारेल असे म्हणून धमकी दिली व एसटी बस समोरच राडा केला. त्यामुळे प्रवाशांनी आकाशला समजविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्यामुळे बराच वेळ हा वाद चालला. परिणामी एसटी चालक ज्ञानदेव गवई यांनी पिंपळगाव राजा पोस्टेला धाव घेऊन घडलेल्या या प्रकाराबाबत तक्रार दिली. त्यामुळे पिंपळगाव राजा पोलिसांनी आरोपी आकाश धुरंदर वय २५ वर्ष रा. ढोरपगाव विरुद्ध शासकीय कामात अरथडा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारामुळे मात्र एसटीमधील इतर प्रवाशांना नाहकचा त्रास सहन करावा लागला व या बसच्या इतर फेऱ्याही रद्द झाल्या. याबाबत अधिक तपास पिंपळगाव राजा पोस्टचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ देशमुख करीत आहेत.

## भगवान गौतम बुध्द जयंतीचे सहकार विद्या मंदिरात आयोजन...

जनसंचलन/बुलढाणा

येथील सहकार विद्यामंदिरात दरवर्षी प्रमाणे तथागत भगवान गौतम बुध्द यांची जयंती वैशाख पौर्णिमा गुरुवार, २३ मे रोजी सकाळी आठ वाजता आयोजित करण्यात आली आहे. जयंती कार्यक्रमास पुज्यनिय यश भंते, श्रीलंका, पुज्यनिय जिवक बोधी भंते यांच्या शुभहस्ते बुध्द वंदना परित्राण पाठ घेवून बुध्द जयंती साजरी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधिक्षक सुनिल कडासने, बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, संस्थेचे चिफ मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. सुकेश झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमल सुकेश झंवर, अतिरिक्त आयुक्त आयकर विभाग, पुणेचे राजेश गवळी, इगतपूरी विपश्यना केंद्रचे आचार्य तेजराव इंगळे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अदृष्य आभासी पुतळ्याचे अनावरण



मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. तरी या जयंती महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन बुलडाणा अर्बन परिवाराच्या वतीने तसेच सहकार विद्यामंदिर बुलडाणा यांच्यावतीने करण्यात आले आहे.